महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग**

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१८/प्र.क्र.१५४९/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ०४ फेब्रुवारी, २०१९

**प्रस्तावना -**

१. पोदार चॅरिटी ट्रस्ट, मुंबई संचलित पोदार इंटरनॅशनल स्कूल, गट नं.२/१, नरसाळा, ता.अचलपूर-परतवाडा, जि.अमरावती या शाळेस मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर शाळेस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासननिर्णय-**

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत पोदार चॅरिटी ट्रस्ट, मुंबई संचलित पोदार इंटरनॅशनल स्कूल, गट नं.२/१, नरसाळा, ता.अचलपूर-परतवाडा, जि.अमरावती ही नवीन शाळा (इयत्ता १ ली ते १२ वी, प्राथमिक ते उच्च माध्यमिक, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर शाळेने **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक** आहे.

(२) शाळेच्या व्यवस्थापनाने **अधिनियम, २००९**मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

**अ)** व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

**ब)** व्यवस्थापनास सन २०१८-१९ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

**क)** शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार **सी.बी.एस.ई. मंडळाशी संलग्नेतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता

(Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत** (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(३) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii)महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२(सन २०१३ चा ०१)मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

(४) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(५) स्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरू करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआप रद्द** समजण्यात येईल.

(६) **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढशाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, "***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील.याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा**"असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(७) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

08.02.2019

**(रा.वि.कुडले)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जि.प. अमरावती.

NOTARIAL REG
ENTRY NO 2232
DATE 16/07/2021

**Establishment of new school on Self-Financed basis under Maharashtra Self aided schools (Establishment and regulation) Act, 2012 as well as giving permission for the academic year 2018-19 to upgrade the existing school.**

**Government of Maharashtra**
**Department of School Education and Sports**

Govt.resolution No.SFS1018/SR.No1549/SM-2 Dated 04 Feb 2019.
Madam Kama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400032
Date: - 04th Feb, 2019

**Preface:-**

1. Podar Charity Trust, Mumbai operated Podar International School, S/No 2/1, Narsala Ta-Achalpur-Paratwada Dist-Amravati has submitted the recognition proposal to the government. The matter of giving approval to this school was under consideration of the Government.

**Government Verdict:-**

2.1 Reference to Maharashtra self financed School (Establishment and regulation) Act 2012 (under 2013-01) Podar International School, S.No 2/1 Narsala Ta- Achalpur Dist- Amravati is run by Podar Charity Trust Mumbai,( Std 1 to 12 all branches form primary to higher secondary, English medium CBSE). The government is giving permission to start the school from the academic year 2018-19 subject to fulfillment of the following terms and conditions.

**2.2 Terms and Conditions:-**

1. The school is required to comply with the provisions right to free and compulsory education act 2009 and all, the rules/provisions prescribed under it from time to time
2. The following permission (letter of intent) has been given by the concerned school management to start the school in the academic year 2018-19 in compliance with the provisions of the act 2009.
3. If the management has fulfilled all the requirements as per the prescribed rules of the Government for setting up a school, the management should apply to the concerned District Education Officer for first approval within one month from the commencement of the academic year.
   A) If the management has fulfilled all the requirements as per the prescribed rules of the Government for setting up a school, the management should apply to the concerned District Education Officer for first approval within one month from the commencement of the academic year.

SEAL OF NOTARY G.B.MANDLE PARATWADA TQ.ACHALPUR DIST.AMRAVATI REGD.NO. 7985 GOVT. OF INDIA

TRUE TRANSLATION
Marathi INTO English

Gopalkrishna Babarao Mandle
Advocate & Notary
Tilak Chowk,Paratwada
Tah.Achalpur Dist.Amravati

B) As the management has been declared eligible by this GR for the year 2018-19, if all the requirements required for setting up a school are not available then school management has to fulfill the requirement as per the prescribed rules by the government, it will be mandatory for them to start the school within 18 months from the date of GR otherwise permission will be automatically canceled.

C) As per the comprehensive policy prescribed in government resolution dated 20th June 2012, CBSE. The school will first need to be approved in order to obtain a NOC. After receiving such approval from the District Education Officer (primary/secondary/inspector of education BrihanMumbai as per paragraph (10) of the government resolution, the institution will apply to the government for NOC after scrutinizing the application, if the school management is fulfilling the prescribed criteria, terms and conditions, the government will issue a NOC to the school.

3) The permitted school shall be bound to comply with (i) the orders and procedures issued by the government from time to time and (ii) all the provisions of the Maharashtra self-aided schools (establishment and regulations) Act,2012 (01 of 2013)

4) The concerned competent authorities ensure that the provisions of the act 2009 have been complied with and only then take further action for first approval.

5) No changes will be made in the future in the medium, school location etc. Requested by the institution for school permission. If the school is started in a place other than a place where the Government has given permission to start the school, the permission given by the Government will be deemed to be automatically revoked.

6) U-DISE Data- While filling in the District wise U-Dise information about the new school/upgraded school allowed by this GR, the responsibility for obtaining U-Dise number will be on the concerned institution by registering in a separate category as **"Permitted Schools on Self-Financed Basis".** The state project director, Maharashtra Primary Education Council, Mumbai has been declared as the nodal officer for further action in this regard. Similarly, for the information of all concerned, the organization will be required to put up a public sign at the entrance outside the school starting **"New School / Upgraded School on Self-Financed Basis"**

7) Recruitment of teachers and Non-teaching staff in permitted Self finance school should be done as prevailing rules and policies of the Government.

TRUE TRANSLATION
Marathi INTO English

Gopalkrishna Babarao Mandle
Advocate & Notary
Tilak Chowk,Paratwada
Tah.Achalpur Dist.Amravati

3 It will be the responsibility of concerned Divisional Deputy Director of Education to inform the concerned organization within 15 days.

**By order and in the name of the Governor of Maharashtra.**

**R.V.Kundale**
**Karyasan Officer, Govt. of Maharashtra**

**Copy to:-**

1. Resp. Commissioner (Education) Maharashtra Pune.
2. State Project Director, Maharashtra Primary Education Council Mumbai
3. Director of Education,(Secondary and Higher Secondary) Directorate of Education, State of Maharashtra, Pune-1
4. Director of Education (primary), Maharashtra Pune.
5. Divisional Deputy Director, Amravati Division, Amravati.
6. Education Officer (Primary/Secondary) Zilha Parishad Amravati.

TRUE TRANSLATION
Marathi IN TO English

Gopalkrishna Babarao Mandle
Advocate & Notary
Tilak Chowk,Paratwada
Tah.Achalpur Dist.Amravati

ATTESTED

GOPALKRISHNA B.MANDLE
NOTARY
PARATWADA,AMRAVATI DIST.

NOTARIAL CANCELLED NOTARIAL CANCELLED NOTARIAL

SEAL OF NOTARY G.B.MANDLE PARATWADA TQ.ACHALPUR DIST.AMRAVATI REGD.NO. 7989 GOVT. OF INDIA